लोकमत

न्यूज Inbox

# सायबर सुरक्षाबद्दल शाळेत जनजागृती

**येडशी :** येथील जिल्हा परिषद शाळेत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठातील संगणकशास्त्र या विभागातील वैष्णवी पाटील या विद्यार्थिनीने ऑनलाइन युगात कशी फसवणूक होते, याची माहिती सांगून दक्षता घेण्याविषयी मार्गदर्शन केले. अनोळखी व्यक्तींना ओटीपी सांगू नये, अनोळखी फोन स्वीकारू नयेत, सोशल मीडियावरील लिंक व मेसेजची पडताळणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जि. प. मुलांची, कन्या शाळा, उर्दू शाळा येथील विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

Hello Dharashiv
Page No. 4 Oct 10, 2024
Powered by: erelego.com